## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- ३६६३/२०२२

**अपिलार्थी, श्री.सचिन दिलीप सांबरे,**
मु.देहेर्जे, ता.विक्रमगड, जि.पालघर ४०१ ४०३.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसुल अधिकारी,
तहसिलदार विक्रमगड यांचे कार्यालय, विक्रमगड
ता.विक्रमगड,जि.पालघर ४०१ ६०५.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय विक्रमगड, ता.विक्रमगड,
जि.पालघर ४०१ ६०५.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय विक्रमगड, ता.विक्रमगड,
जि.पालघर ४०१ ६०५.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २१.०१.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०६.०७.२०२२ | -- | २१.०९.२०२२ | -- |

अपिलार्थी यांनी दि. २२.१२.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *" जन माहिती अधिकारी यांनी विहित वेळेत उत्तर दिलेले नाही. याबाबत प्रथम अपिल अर्ज दाखल केला असता आजपर्यंत सुनावणी घेण्याचे कळविले नाही. "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २१.०१.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी व प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्री.संदिप बाळू म्हात्रे, नायब तहसिलदार व जन माहिती अधिकारी श्री.पवन गणपत भोईर, ग्राम महसूल अधिकारी, तहसिल कार्याल विक्रमगड उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" माझ्या वडीलोपार्जित जमीन सर्व्हे क्र. १५ हिस्से क्र.१,२,३,४ (फेरफार क्र.३९, १५.०९.१९८४) बाबत मे.तहसिलदार जव्हार यांचेकडील आदेश क्र.टेनन्सी/केस नं.८४क ११३, दि.०२.१२.१९८३, ची आदेश प्रत व संबंधित सर्व दस्तावेज मिळणेबाबत."*

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांना दि.१९.०१.२०२६ रोजीच्या पत्रान्वये माहिती देण्यात आलेली आहे. तथापि या पत्रावरुन असे निदर्शनास येते की, सदरची माहिती तलाठी सजा देहर्जे यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे.

अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे अवालेकन केले असता, असे दिसून येते की, त्यांनी तहसिलदार जव्हार यांचेकडील आदेश क्र.टेनन्सी/केस नं.८४ क ११३ दि.०२/१२/१९८३ या प्रकरणातील आदेशाच्या प्रतीची मागणी केली आहे. सदरची माहिती तहसिलदार कार्यालयात उपलब्ध असणे अपेक्षित आहे, असे असताना तलाठी यांनी कोणती माहिती उपलब्ध करुन दिली हे स्पष्ट होऊ शकले नाही. सबब या संदर्भात उपस्थित जन माहिती अधिकारी श्री.संदिप बाळू म्हात्रे, नायब तहसिलदार विक्रमगड यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीची नस्ती तहसिलदार कार्यालयात आढळून येत नाही. त्याप्रमाणे अपिलार्थी यांना दि.०२.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. मात्र अशी संचिका आढळून का येत नाही, यासंदर्भात जन माहिती अधिकारी हे कोणतेही कारण देऊ शकले नाहीत.

वस्तुत: टेनन्सी प्रकरणात दिलेला निकाल व संबंधीत नस्ती हे कायमस्वरुपीचे दस्तावेज आहेत. त्यामुळे सदर नस्ती उपलब्ध का नाही, याचा खुलासा होणे अतिशय आवश्यक आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय विक्रमगड यांनी सदर नस्ती का उपलब्ध नाही याबाबतची कारणे पुढील सुनावणीच्या वेळी सादर करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, विक्रमगड यांनी सदर नस्ती त्यांचे कार्यालयात का उपलब्ध नाही. याबाबतची कारणे पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावीत.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.११.०३.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ जानेवारी, २०२६ .

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

(शेखर चन्द्रे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ